<u>नियमीत फौ. ख.क्र.२००/२०१७</u>
सरकार विरुध्द मनोज वगैरे
निशाणी क्र.३१

## <u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र (०१) यांची जबानी.</u>

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांवः– शितल विकास वाळके,
वय सुमारेः– ३० वर्ष, व्यवसायः– शेती,
निवासस्थानः– माळीबाभुळगाव, ता. पाथर्डी जि. अहमदनगर

## <u>सर तपासणी</u>

### <u>अभियोग पक्षाकरिता श्रीमती. ए. बी. कुलकर्णी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.</u>

मी आरोपी हे भावकीतील व शेजारी असल्याने त्यांना ओळखते. घटना साधारण सात ते आठ वर्षापुर्वी माळीबाभुळगाव येथे सकाळी १०.०० च्या सुमारास घडली होती. घटनेदरम्यान माझा व आरोपींचा शेतातील बांधाच्या कारणावरुन किरकोळ वाद झाला होता. त्यानंतर मी रागा रागाने आरोपींविरुध्द फिर्याद दाखल केली होती. या व्यतिरीक्त काही घडले नव्हते. असे काही घडले नाही की, दि.१८.०६.२०१४ रोजी सकाळी १०.०० वाजण्याचे सुमारास आरोपी मनोज याने किरकोळ भांडणाच्या कारणावरुन दमदाटी केली. मी व माझे पती त्यांना समजावुन सांगत असताना आरोपीने मला व माझ्या पतीला शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली तसेच, आरोपी मारुती यांनी माझे ब्लाऊज व साडी ओढुन माझा विनयभंग केला त्यावेळी आरोपी अनिल याने तुझी इज्जत ठेवणार नाही माझी मंत्र्यान पर्यंत ओळख आहे, मी तुमचा एक एकेकाचा काटा काढीन अशी धमकी दिली. आता मला माझी फिर्याद दाखवण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहीत नाही. सहीस **निशाणी क्र.३२** देण्यात येते.

(साक्षीदार पुर्वीच्या जवाबाप्रमाणे साक्ष देत नसल्यामुळे सरकारी वकीलांनी साक्षीदारास फितूर घोषित करुन उत्तर सूचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. ... सबब ती देण्यात आली.)

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि.१८.०६.२०१४ रोजी सकाळी १०.०० वाजण्याचे सुमारास आरोपी मनोज याने किरकोळ भांडणाच्या कारणावरुन दमदाटी केली. मी व माझे पती त्यांना समजावुन सांगत असताना आरोपीने मला व माझ्या पतीला शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली तसेच, आरोपी मारुती यांनी माझे ब्लाऊज व साडी ओढुन माझा विनयभंग केला त्यावेळी आरोपी अनिल याने तुझी इज्जत ठेवणार नाही माझी मंत्र्यान पर्यंत ओळख आहे, मी तुमचा एक एकेकाचा काटा काढीन अशी धमकी दिली. माझ्या फिर्यादीतील अधोरेखांकित भाग 'अ' मी पोलीसांना सांगितला नव्हता. तो माझ्या फिर्यादीत कसा आला हे

मी सांगू शकत नाही. आरोपीसोबत आमची न्यायालयाबाहेर तडजोड झालेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी आरोपीसोबत तडजोड झाल्यामुळे त्याला वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपासणी**

**आरोपीकरिता श्री.आर. एन. खेडकर वकील यांनी नाकारला.**

... फेर तपास ... काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

RAVIKIRAN VITTHAL SAPATE

Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2026.03.17 17:56:26 +0530

दिनांकः १७.०३.२०२६.

(**रविकिरण सपाटे** )
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पाथर्डी जि. अहमदनगर.